# ग्रामीण महिलांच्या सामाजिक समस्या

**शरद भिमराव गाडेकर**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना,**

स्त्री ही शक्तीची देवता आहे. नारीशक्ती म्हणून आपण तिचा गौरव करतो भारत देशाला ही आपण भारत माता म्हणून संभवतो त्याच भारत देशातील ग्रामीण स्त्रियांना आजही 21 व्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे असतांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते भारतात एकूण लोकसंख्येच्या 48.5% स्त्रिया आहे आणि यातील बहुसंख्य महिला या ग्रामीण भागातील आहेत. शहरी भागातील स्त्रियांच्या तुलनेत या महिलांना आरोग्य,शिक्षण,सामाजिक,वैवाहिक, रोजगार अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. शासनाच्या योजना सोयी सवलतीच्या विषयी त्या अनस्थितीनं असतात. सामाजिक दृष्टिकोनातून विचार केला तर स्त्री आणि पुरुष ही संसाररूपी रथाची दोन चाके आहेत पण स्त्रीला आजही समाजात दुय्यम स्थान आहे कारण आपली संस्कृती ही पुरुष प्रधान संस्कृती आहे. मुलगा पुरुष यांनाच अजूनही समाजात श्रेष्ठ समजले जाते पण एक स्त्री शिक्षित झाली तर ती सर्व कुटुंबाला शिक्षित करते. हे अजूनही आपल्याला समजलेले नाही.

स्त्री ही तिच्या कुटुंबाचा कणा असते कुटुंबाला एकत्रित बांधण्याची क्षमता तिच्यामध्ये असते असे म्हणतात की महिलांच्या आर्थिक सामाजिक परिस्थितीकडे बघितले असता तुम्हाला त्या देशाची संस्कृती समजू शकते. परंतु महिला आज पुरुषांच्या अर्धे आकाश पेलताना दिसत आहेत हे हीच सत्य नाकारता येणार नाही. मन बधीर करणाऱ्या घटना आजूबाजूला घडत असताना सकारात्मक विचार जपणाऱ्या आणि हेच सकारात्मक विचारांचे बीज सर्वत्र पसरवणाऱ्या अनेक जणी आहेत. महिलांचा जीवन स्तर उंचवावा यासाठी अनेक पातळीवर विविध प्रयोग सुरू आहेत, ज्यामध्ये महिलांचा सहभाग हा खूप महत्त्वाचा मानला जातो. महिला सबलीकरण आणि महिला सक्षमीकरण असे शब्द अजून तिथे पोहोचले नाही त्या गाव पातळीवर महिलांचे जीवन अधिक कष्टमय वाटते. जुन्या काळात स्त्री म्हणजे एक उपभोक्त वस्तू आणि मूल निर्माण करण्याचे एक यंत्र एवढीच तिची किंमत होती.चुल,मुल आणि उंबरठ्याच्या आत पाऊल एवढीच तिची मर्यादा होती. नवऱ्याला साथ देणे,

वारंवार येणारी बाळंतपण झेलणं आणि मुलांच्या स्वस्ता खान एवढच तीच नित्य कर्म होतं. ती स्त्री शारीरिक दृष्ट्या सक्षम होणे शक्यच नव्हते. शैक्षणिक म्हणाल तर मुलींना दुसऱ्या,तिसऱ्या इयत्तेतूनच शाळेतून काढलं जायचं म्हणजे पुढे तिला आर्थिक व्यवहार कळायला नकोत. फक्त सही करता आले की झालं. म्हणजे शैक्षणिक दृष्ट्याही स्त्री सक्षम नव्हती आणि पर्यायाने आर्थिक बाबतीत सुद्धा ती सशक्त किंवा सक्षम नव्हती. एवढ्या सगळ्यांमधून समाजात काय चाललंय हे बघायला तिला वेळच नव्हता. म्हणजेच स्त्रीचं सबलीकरण त्या काळाला मान्यच नव्हते स्त्रीवर जबरदस्ती करण हे सहज शक्य होतं, हळूहळू काळ बदलू लागला. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले,रमाबाई रानडे महादेव गोविंद रानडे,अण्णासाहेब कर्वे या सर्वांनी घरचा प्रखर विरोध करून, प्रसंगी सेना दगडाचा मारा सोसून समाजातल्या कर्मठ व प्रतिष्ठित म्हणवणाऱ्यांचा कु चेष्टा सहन करून स्त्रीला सक्षम बनवण्याचा चंगच बांधला. त्यांना स्वावलंबी करण्याची गरज होती. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची सुरुवात केली निराधार आणि विधवा महिलांना आधार दिला. स्वतःच्या घरात त्यांना आश्रय देऊन सुरक्षित केले महादेव गोविंद रानडे व त्यांच्या पत्नी रमाबाई रानडे यांनी पुण्यात हुजूरपागा, सेवा सदर अशा शाळा फक्त मुलींसाठी सुरू करून महिलांना सक्षम करण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल उचलले. त्यांच्याही पुढे जाऊन अण्णासाहेब कर्वे यांनी पुनर्विवाहाची मुहूर्तमेढ रोवली व स्वतः एका विधवेशी विवाह करून लोकांपुढे एक उदाहरण घालून दिले. महिलांच्या हिंगणे स्त्री शिक्षण संस्था काढली राजा राममोहनरॉय यांनी सतीची चाल बंद केली.डॉ. आनंदीबाई जोशी यांनी परदेशात जाऊन डॉक्टरकीचं शिक्षण पूर्ण करून भारतातील पहिली डॉक्टर होण्याचा मान मिळवला.

आज जी सक्षम महिला दिसत आहे ती या सगळ्यांनी केलेल्या अथक परिक्षमाचा परिपाक आहे. आज स्त्री सुरक्षित आहे स्वतःच्या पायावर उभी आहे. अर्थात शैक्षणिक आणि आर्थिक दृष्ट्या ही ती सक्षम आहे पण त्याचबरोबर वैचारिक दृष्ट्याही ती सशक्त असायला हवी. नुसतं पुस्तकी शिक्षण घेऊन पदवी मिळवून किंवा गलेलठ्ठ पगार मिळवला म्हणजे स्त्री सक्षम झाली किंवा सबल झाली असे नाही. त्याला विचारांची, संस्काराची जोड असणे तितकेच गरजेचे आहे व त्याचबरोबर वैचारिक सशक्तिकरण, सक्षमीकरण होणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

महिलांचे खरोखरच सशक्तिकरण, सक्षमीकरण, सबलीकरण करायचे असेल तर त्यांना शिक्षण दिले पाहिजे. त्यांच्यामध्ये एकजूट निर्माण केली पाहिजे आर्थिक दृष्ट्या त्यांना स्वावलंबी करण्याची

खरंच गरज आहे. त्यांच्यातील गुप्त गुणांची ओळख त्यांना करून दिली पाहिजे. त्यांना आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे. तरच नारीशक्ती मागे भक्कमपणे उभी राहील आणि अत्याचाराला येणाऱ्या प्रत्येक संकटाला स्त्रिया समर्थपणे तोंड देतील. प्रतिकार करतील आणि त्या त्या यशस्वी होतील.

स्त्री ही तिच्या कुटुंबाचा कणा असते कुटुंबाला एकत्रित बांधण्याची क्षमता तिच्यामध्ये असते असे म्हणतात की महिलांच्या आर्थिक सामाजिक परिस्थितीकडे बघितले असता तुम्हाला त्या देशाची संस्कृती समजू शकते. परंतु महिला आज पुरुषांच्या अर्धे आकाश पेलताना दिसत आहेत हे हीच सत्य नाकारता येणार नाही. मन बधीर करणाऱ्या घटना आजूबाजूला घडत असताना सकारात्मक विचार जपणाऱ्या आणि हेच सकारात्मक विचारांचे बीज सर्वत्र पसरवणाऱ्या अनेक जणी आहेत. महिलांचा जीवन स्तर उंचवावा यासाठी अनेक पातळीवर विविध प्रयोग सुरू आहेत, ज्यामध्ये महिलांचा सहभाग हा खूप महत्त्वाचा मानला जातो.

महिला सबलीकरण आणि महिला सक्षमीकरण असे शब्द अजून तिथे पोहोचले नाही त्या गाव पातळीवर महिलांचे जीवन अधिक कष्टमय वाटते. जुन्या काळात स्त्री म्हणजे एक उपभोक्त वस्तू आणि मूल निर्माण करण्याचे एक यंत्र एवढीच तिची किंमत होती.चुल,मुल आणि उंबरठ्याच्या आत पाऊल एवढीच तिची मर्यादा होती. नवऱ्याला साथ देणे, वारंवार येणारी बाळंतपण झेलणं आणि मुलांच्या स्वस्ता खान एवढच तीच नित्य कर्म होतं. ती स्त्री शारीरिक दृष्ट्या सक्षम होणे शक्यच नव्हते. शैक्षणिक म्हणाल तर मुलींना दुसऱ्या,तिसऱ्या इयत्तेतूनच शाळेतून काढलं जायचं म्हणजे पुढे तिला आर्थिक व्यवहार कळायला नकोत. फक्त सही करता आले की झालं. म्हणजे शैक्षणिक दृष्ट्याही स्त्री सक्षम नव्हती आणि पर्यायाने आर्थिक बाबतीत सुद्धा ती सशक्त किंवा सक्षम नव्हती. एवढ्या सगळयांमधून समाजात काय चाललंय हे बघायला तिला वेळच नव्हता. म्हणजेच स्त्रीचं सबलीकरण त्या काळाला मान्यच नव्हते स्त्रीवर जबरदस्ती करण हे सहज शक्य होतं, हळूहळू काळ बदलू लागला.

महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले,रमाबाई रानडे महादेव गोविंद रानडे,अण्णासाहेब कर्वे या सर्वांनी घरचा प्रखर विरोध करून, प्रसंगी सेना दगडाचा मारा सोसून समाजातल्या कर्मठ व प्रतिष्ठित म्हणवणाऱ्यांचा कु चेष्टा सहन करून स्त्रीला सक्षम बनवण्याचा चंगच बांधला. त्यांना स्वावलंबी करण्याची गरज होती. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची सुरुवात केली निराधार आणि विधवा महिलांना आधार दिला. स्वतःच्या घरात त्यांना आश्रय देऊन

सुरक्षित केले महादेव गोविंद रानडे व त्यांच्या पत्नी रमाबाई रानडे यांनी पुण्यात हुजूरपागा, सेवा सदर अशा शाळा फक्त मुलींसाठी सुरू करून महिलांना सक्षम करण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल उचलले. त्यांच्याही पुढे जाऊन अण्णासाहेब कर्वे यांनी पुनर्विवाहाची मुहूर्तमेढ रोवली व स्वतः एका विधवेशी विवाह करून लोकांपुढे एक उदाहरण घालून दिले. महिलांच्या हिंगणे स्त्री शिक्षण संस्था काढली राजा राममोहनरॉय यांनी सतीची चाल बंद केली.डॉ. आनंदीबाई जोशी यांनी परदेशात जाऊन डॉक्टरकीचं शिक्षण पूर्ण करून भारतातील पहिली डॉक्टर होण्याचा मान मिळवला.

आज जी सक्षम महिला दिसत आहे ती या सगळयांनी केलेल्या अथक परिक्षमाचा परिपाक आहे. आज स्त्री सुरक्षित आहे स्वतःच्या पायावर उभी आहे. अर्थात शैक्षणिक आणि आर्थिक दृष्ट्या ही ती सक्षम आहे पण त्याचबरोबर वैचारिक दृष्ट्याही ती सशक्त असायला हवी. नुसतं पुस्तकी शिक्षण घेऊन पदवी मिळवून किंवा गलेलठ्ठ पगार मिळवला म्हणजे स्त्री सक्षम झाली किंवा सबल झाली असे नाही. त्याला विचारांची, संस्काराची जोड असणे तितकेच गरजेचे आहे व त्याचबरोबर वैचारिक सशक्तिकरण, सक्षमीकरण होणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

महिलांचे खरोखरच सशक्तिकरण, सक्षमीकरण, सबलीकरण करायचे असेल तर त्यांना शिक्षण दिले पाहिजे. त्यांच्यामध्ये एकजूट निर्माण केली पाहिजे आर्थिक दृष्ट्या त्यांना स्वावलंबी करण्याची खरंच गरज आहे. त्यांच्यातील गुप्त गुणांची ओळख त्यांना करून दिली पाहिजे. त्यांना आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे. तरच नारीशक्ती मागे भक्कमपणे उभी राहील आणि अत्याचाराला येणाऱ्या प्रत्येक संकटाला स्त्रिया समर्थपणे तोंड देतील. प्रतिकार करतील आणि त्या त्या यशस्वी होतील.

कौटुंबिक समस्या;आज विज्ञान आणि व ज्ञानाच्या तंत्रज्ञानात खूप प्रगती झाली आहे. तरीही आजही काही कुटुंबांमध्ये मुलगा आणि मुलगी असा भेद केला जातो. मुलगी जन्माला आली म्हणून स्त्रीला कुटुंबात त्रास दिला जातो. घरातील कामे लग्नातील मानपान सौंदर्य या गोष्टीसाठी तिला त्रास सहन करावा लागतो.कुठे कुठे स्त्री कमावती नसली तर तिला घर बैठी हेच खाऊ म्हणून संबोधले जाते व त्यासाठी बोलणे खावे लागते. विधवा स्त्री असेल तर त्यांनाही घरातून बाहेर कांग पोकपी या ठिकाणची घटना, दिल्ली येथील सामूहिक बलात्कार घटना अजूनही एवढे कायदे केले आहे. तरी अशा घटना घडतात. आणि त्याचा तपास लागायला व शिक्षा व्हायला महिनो गती लागतात. यासारखे दुर्दैव नाही अशा घटनांची दिवसेंदिवस वाढ होत आहे नोकरी करणाऱ्या महिलांचा त्यांच्या कार्यस्थळी वरिष्ठ अत्याचारांच्या घटना घडतात. महिलांच्या कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक

छळासाठी लैंगिक छळ कायदा करण्यात आला लैंगिक छळ हा 354 अ अंतर्गत व्यक्त केलेला गुन्हा आहे पण नुसते कायदे करून चालणार नाही तर त्याची अंमलबजावणी होणे महत्त्वाचे आहे. कौटुंबिक हिंसाचाराचाही घटनांची ही अनेक उदाहरणे आपण पाहतो. कोवळया कळया उमलण्या आधीच कुच करून टाकल्या जातात अशा नराधमासाठी कडक शिक्षेची तरतूद कायद्यात असायला हवी व तात्काळ निर्णय लागायला हवे त्या समस्येवर तोडगा निघू शकेल आरोपीला लाच घेऊन सोडून दिले जाते त्यामुळे या घटका मध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.

सामाजिक समस्या:ग्रामीण भागातील स्त्रियांना सामाजिक समस्यांनाही तोंड द्यावे लागते. मुलगी जन्मल्यापासूनच तिला दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. मुलगी जन्मल्या यामुळे घरात नैराश्याचे वातावरण असते कारण ग्रामीण भागात मुलगा म्हणजेच वंशाचा दिवा अशी धारणा असल्यामुळे ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणावर बंधने आणली जातात. तसेच मुलगी हे परक्या घरचे धन आहे असे समजून तिच्या बाल्यावस्थेतच तिचा विवाह केला जातो. तर सासरच्या घरी ही विवाह करून आणलेल्या मुलीला मोलकरणीप्रमाणे वागणूक दिली जाते. तसेच तिने चूल आणि मूल हेच सांभाळावे अशी अपेक्षा असते काही ग्रामीण भागातील स्त्रियांना हुंडे न मिळाल्यामुळे सासरच्या जाचाला सामोरे जावे लागते तसेच वारंवार मुली जन्माला आल्यास त्याचा दोष देखील स्त्रीला दिला जातो. याप्रसंगी स्त्रियांना मारहाण,गर्भपात, छळ अशा समस्यांचा सामना करावा लागतो काही परिस्थितीत पुरुष आपल्या बायकोला सोडून दुसरा विवाह करतात व तो अन्याय तिला निमुटपणे सहन करावा लागतो. परिणामी ग्रामीण स्त्री ही शारीरिक व मानसिक दृष्ट्या दुर्बळ होते व ती पूर्णपणे आपले अस्तित्व गमावते.ग्रामीण भागातील नवऱ्यांच्या व्यसनाधीनतेमुळे अनेक स्त्रियांना नरकवास सहन करावा लागत आहे. त्याला विरोध करण्याची ताकद एकट्या स्त्रीमध्ये नाही तसा विरोध करणे म्हणजे मारहाण आणि बाहेर व्यालीपणाला आमंत्रण देणे होय. म्हणजेच माहेरची सत्ता नाही, लहानपणी वडिलांच्या धाकात, तरुणपणी नवऱ्याच्या ताब्यात व म्हातारपणी मुलांच्या तालावर तारेवरची कसरत करीत जाणे जगावे ही ग्रामीण स्त्रियांची कौटुंबिक व सामाजिक स्थिती दिसून येते.

सारांश रुपाने ग्रामीण महिलांच्या सामाजिक समस्यावर या शोध निबंधावर प्रकाश टाकला असता ग्रामीण महिलांच्या वेगवेगळया समस्या आहेत. त्यामध्ये कौटुंबिक समस्या, विवाहविषयक समस्या श्रमविभाजन, मालमत्ता, हुंडा पद्धत, वैवाहिक जीवन, पुरुषांची व्यसनाधीनता,अपत्य न होणे

आरोग्य विषयक समस्या या गंभीर स्वरूपाच्या समस्या आहेत यांचे कायमस्वरूपी उच्चाटन करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी पुढे येऊन सांगितलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात यावी.

**संदर्भसूची**

(1) डॉ.आशा परूळेकर- आधुनिक स्त्रीच्या समस्या मेहता पब्लिशिंग हाऊस1216, सदाशिव पेठ,पुणे-30.

(2) ग्रामीण भागातील स्त्रियांच्या समस्या.(डॉ.डी.व्ही.पवार उपप्राचार्य आणि विभाग प्रमुख, ग्रामीण विकास कीर्ती महाविद्यालय,दादर-400 028.

(3) सिंह,ह(2018),महिला अत्याचार आणि त्याचे सामाजिक परिणाम,पुणे,सामाजिक संशोधन संस्थान.

(4) रानडे प्रतिभा स्त्री प्रश्नाची चर्चा पॉप्युलर प्रकाशन मुंबई-1991